वर्ष ११ वे

अंक १ ला

**वस्तुस्थिती स्वीकारायला शिकणं, मार्ग शोधणं**
**हे आशावादी, सकारात्मक आयुष्याचं लक्षण आहे.**




# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

**(रजि.नं. एफ/१४२७/पुणे, स्थापना : ०३.१२.१९७९)**
**यांचे मुखपत्र**

# संवाद

### नियोजित वसतिगृहाची वैशिष्ट्ये

- इमारतीचे एकूण क्षेत्रफळ १२३१०.०० चौ.फुट (४ मजले - ९८४८ चौ.फूट व पार्किंग २४६२ चौ.फूट)
- बांधकामाचा एकूण अपेक्षित खर्च रु.१ कोटी २० लक्ष
- प्रत्येक मजल्यावर विद्यार्थ्यांसाठी ८ खोल्या व २ सेल्फ कंटेन्ड खोल्या
- खोलीचा आकार १०' x १४'
- एकूण १६० विद्यार्थ्यांची सोय.

**डिसेंबर २०१०-जाने.-फेब्रु.-मार्च २०११**

फक्त सभासदांकरिता
(खाजगी वितरणासाठी)

### आपण यापैकी काय करु शकतो?

- रु. दहा लक्ष व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव एका मजल्यास दिले जाईल.
- रु. एक लक्ष व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव खोलीस दिले जाईल.
- रु. ५००० व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव विशेष फलकावर लावले जाईल.

**जी दानशूर व्यक्ती मंडळाच्या शैक्षणिक फंडास रुपये एक लक्ष किंवा अधिक देणगी देईल त्या व्यक्तीने शिफारस केलेल्या विद्यार्थ्यास वसतिगृहाच्या मासिक शुल्कामध्ये दरमहा रु.५००/- शिष्यवृत्तीच्या स्वरुपात सवलत देण्यात येईल.**

# संपादकीय

प्रिय सभासद,

दि. २९ ऑगस्ट २०१० रोजी पारनेर तालुका मित्र मंडळाचा **स्नेह मेळावा, विद्यार्थी व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम** अत्यंत उत्साहात आपल्याच वसतिगृहाच्या आवारात पार पडला. विशेषतः वरीष्ठ शासकीय अधिकारी व उद्योजक यांची उपस्थिती उल्लेखनीय होती. सभासद व हितचिंतक ज्या मोठ्या संख्येने हजर होते त्यावरून मला तरी वाटते की, आता सर्व पारनेरकरांना मंडळाकडून फार मोठ्या अपेक्षा निर्माण झाल्या आहेत. पारनेर तालुका मित्र मंडळाने सर्वांची विश्वासार्हता मिळविल्याने मंडळाची जबाबदारी वाढली आहे. या विश्वासार्हतेमुळेच कार्यकारीणीचा उत्साह द्विगुणीत झाला आहे. शिवश्री हौसाराम घोडके यांच्या नेतृत्वाखाली पुढील झेप घेण्यासाठी सर्व कार्यकारीणी सभासद पावले टाकीत आहेत. मला मात्र एका बाबीची खंत वाटते ती म्हणजे मंडळाच्या विशेष सर्वसाधारण बैठकीमध्ये आपण अद्यापही अपेक्षित सहभाग घेत नाहीत. या बैठकीमध्ये सभासदांकडून सुचना व मार्गदर्शन अपेक्षित असते. त्याबाबत पुढील वेळी अपेक्षाभंग होणार नाही अशी अपेक्षा बाळगतो.

मंडळाचे **बोधचिन्ह (Logo)** मागील काही वर्षापासून आपण पहात आहातच. हे **बोधचिन्ह** अहमदनगर येथील **डॉ.शरद ठुबे** यांनी तयार केले आहे. त्याची पार्श्वभूमी त्यांनी त्यांच्या शब्दात विशद केली आहे. अतिशय चांगले बोधचिन्ह मंडळास आरेखन करुन दिल्याबद्दल डॉ.शरद ठुबे यांना धन्यवाद!

पारनेर तालुका मित्र मंडळाचे काम पाहून इतर शहरातील मंडळींनीसुद्धा एकत्र येऊन योगदान देण्याबाबत पावले उचललेली आहेत. त्यामध्ये नाशिक येथे इंजि.हसन मुजावर यांच्या नेतृत्वाखाली **'पारनेर तालुका मित्र मंडळ, नाशिक'** चे काम सुरु झाले आहे. **वाशी, नवी मुंबई येथील विष्णुदास भावे नाट्यगृहामध्ये दि.२१ नोव्हेंबर २०१० रोजी पारनेर तालुक्यातील मुंबई येथील रहिवाश्यांनी 'पारनेर तालुका युवा मंडळ नवी मुंबई' या संस्थेची स्थापना केली आहे.** या संस्थेच्या उद्घाटन कार्यक्रमामध्ये या मंडळाच्या अध्यक्षासह बरेच सभासद उपस्थित होते. महत्वाच्या शहरांमध्ये हे नेटवर्क असेच वाढत राहो ही अपेक्षा!

या अंकाच्या **'नांदा सौख्य भरे, भावपूर्ण निरोप, निधनवार्ता, आपण असे केले तर व अभिनंदन'** या सदरांद्वारे खरे तर आपल्या सर्वांना विविध प्रकारच्या बातम्या मिळत असतात. त्या सदरांचे सर्व श्रेय शिवश्री हौसाराम घोडके यांचेच आहे. तथापि याबरोबरच आम्ही चालू केलेल्या **'कर्तृत्व पारनेरकरांचे'** या सदरास आपल्याकडून पाहिजे तसा प्रतिसाद मिळत नाही, हे खेदाने नमूद करावेसे वाटते. आपल्या तालुक्यातील व्यक्तींकडे खूप मोठी गुणवत्ता असल्याचे मी मागील अंकाच्या संपादकीयमध्ये म्हटलेच आहे. ते या अंकाच्या माध्यमातून सर्व सभासदांपुढे येणे आवश्यक आहे. ते आणणे आम्ही आमचे कर्तव्य मानतो. म्हणून आपण या सदरासाठी आमच्याकडे माहिती पाठवावी ही विनंती.

सन २०१० ते २०१३ या कालावधीकरिता मंडळाच्या नवीन कार्यकारीणीची निवड झाली आहे. नवीन सर्व कार्यकारीणी सदस्यांचे मी अभिनंदन करतो व त्यांच्याकडून भरीव योगदानाची अपेक्षा करून त्या सर्वांना शुभेच्छा व्यक्त करून माझे संपादकीय थांबवतो.


जय जिजाऊ। जय शिवराय।।

**इंजि.विजयकुमार ठुबे**
संपादक


।। ॐ गं गणपतये नमः।।

**वास्तुदोषामुळे अनेक अडचणी येतात ! चुकीच्या प्रवेशद्वारामुळे कर्जाचे डोंगर, नातेसंबंधामध्ये तणाव कोर्टमॅटर, टॉयलेट दोषामुळे व्यवसायाच्या-करीयरच्या चांगल्या संधी हिरावून घेतल्या जातात. वास्तुतील महादोषामुळे धंद्यात नुकसान, संतती समस्या, कुलक्षय, अपघात, चोरी, स्त्रीदोष, धननाश, आरोग्याच्या तक्रारी, अश्या अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते.**

**वास्तुच्या एनर्जी लेव्हल तपासून यंत्र, रत्न स्थापना / विनातोडफोड, पिरॅमीडद्वारे सुख, समृद्धी मिळवा.**



वास्तुविषयक सल्ला व मार्गदर्शन

**चैतन्य एंटरप्रायजेस**

३९५, नारायण पेठ, पुणे ४११ ०३०. **मो. ९०४९२५८७८७, ९८२३४१५५३१**

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

## वार्षिक सर्वसाधारण सभा, स्नेह मेळावा, विद्यार्थी व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम वृत्तांत

रविवार दिनांक २९.०८.२०१० रोजी पारनेर तालुका मित्र मंडळाचा स्नेहमेळावा, विद्यार्थी व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम तसेच वार्षिक सर्वसाधारण सभा मंडळाच्या विद्यार्थी वसतिगृहामध्ये घेण्यात आली. स्नेहमेळाव्याच्या अध्यक्षस्थानी **मा.अजित गव्हाणे**, माजी स्थायी समिती अध्यक्ष व विद्यमान नगरसेवक, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हे होते. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून **मा.तुषार दोशी**, ॲडीशनल.एस.पी., ॲंटी करप्शन ब्युरो, पुणे हे होते. प्रमुख उपस्थितांमध्ये **मा. राम पठारे**, पोलीस निरीक्षक, **मा.विश्वनाथजी कोरडे**, संचालक, रुपी को-ऑप.बँक, **मा.दत्तात्रय ठुबे**, अधीक्षक अभियंता, सा.बां.विभाग, सॉलीसीटर **विकास पोटघन**, **श्री.अनंतराव मातेरे** व मंडळाचे सर्व पदाधिकारी व्यासपीठावर उपस्थित होते.




*व्यासपीठावर डावीकडून इंजि.विजयकुमार ठुबे,श्री.अजित गव्हाणे, श्री.तुषार दोशी, श्री.विश्वनाथ कोरडे, सॉलीसीटर विकास पोटघन, डॉ.बाळासाहेब बांडे, श्री.राम पठारे व मार्गदर्शन करताना श्री.दत्तात्रय ठुबे.*

मान्यवरांच्या शुभहस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून दीप प्रज्वलन करण्यात आले. व्यासपीठावरील सर्व मान्यवरांचा पुष्पगुच्छ व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.



*दीप प्रज्वलन करताना श्री.राम पठारे, डावीकडून इंजि.ठुबे, श्री.पठारे, श्री.अजित गव्हाणे व श्री.हौसाराम घोडके*

मा.अध्यक्षांचा परिचय मंडळाचे सहसेक्रेटरी **सुनील पोटे** यांनी करून दिला. तसेच प्रमुख पाहुणे श्री.तुषार दोशी यांचा परिचय मंडळाच्या बांधकाम समितीचे अध्यक्ष **इंजि.विजयकुमार ठुबे** यांनी करुन दिला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना इंजि.विजयकुमार ठुबे यांनी पारनेर तालुका मित्र मंडळाच्या आतापर्यंतच्या वाटचालीचा आढावा घेतला व भावी कार्यक्रमाची दिशा स्पष्ट केली. वसतिगृहाच्या व्यवस्थापन, अंतर्गत रचना व सुविधा या विषयीची माहिती त्यांनी दिली. तसेच संवाद मुखपत्राचे संपादक या नात्याने मासिकासाठी आपले लेख, माहिती स्वागतार्ह असल्याचे आवाहन केले.

विविध क्षेत्रातील गुणवंत ग्रामस्थांचा परिचय मंडळाचे कार्यवाहक **डॉ.बाळासाहेब बांडे** यांनी करुन दिला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते सदर ग्रामस्थांचा सन्मानचिन्ह व गुलाबपुष्प देऊन सन्मान करण्यात आला.

यानंतर इ.१० वी, १२ वी व इतर शाखांतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. **प्रा.गोरक्ष जगताप व श्री.बाळासाहेब येणारे** यांनी विद्यार्थी सत्कार



*कार्यक्रमास उपस्थित असलेला जनसमुदाय.*

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

विद्यार्थ्यांना सी.ए. श्री.शिवाजीराव झावरे लिखीत **''माझे ध्यासपर्व''** हे पुस्तक गुलाबपुष्प व प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात आले.




*मंडळाचे अध्यक्ष श्री.हौसाराम घोडके व त्यांच्या पत्नी सौ.विमल यांचा सत्कार करताना मान्यवर.*

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे **श्री.तुषार दोशी** यांनी आपल्या भाषणामध्ये मंडळाच्या कार्याचे व वसतिगृहाच्या बांधकामाचे कौतुक करुन मंडळाच्या पुढील कामकाजास शुभेच्छा दिल्या.

**श्री.विश्वनाथ कोरडे** यांनीही मंडळाच्या माध्यमातून व सर्व पुणेकर वासियांनी आपल्या गावाकडे मदत करण्याचे आवाहन केले. तसेच तालुक्यातील प्राथमिक शाळांच्या दुरावस्थेबद्दलही चिंता व्यक्त केली.

**इंजि.दत्तात्रय ढुबे** यांनी पारनेर तालुका मित्र मंडळासाठी व पारनेरच्या विकासासाठी सर्व प्रकारे मदत करण्याचे आश्वासन दिले.

**पोलीस निरीक्षक श्री.राम पठारे** यांनी आपल्या मनोगतामध्ये पारनेरकर विद्यार्थ्यांना यशस्वी होण्याबद्दलच्या टीप्स दिल्या व मंडळाच्या कामास शुभेच्छा दिल्या.

सत्काराला उत्तर देताना प्रातिनिधीक स्वरुपामध्ये **कु.प्रतिक विजयकुमार ढुबे** (कान्हूर पठार), **कु.प्रशांत सुरेश वाळुंज** (वडनेर हवेली) व **कु.मंगेश रेपाळे** (राळेगण सिद्धी) यांनी विद्यार्थ्यांतर्फे आपले मनोगत व्यक्त केले.

अध्यक्षीय भाषणामध्ये **मा.अजित गव्हाणे** यांनी ''पारनेर व माझा पूर्वीपासूनचा स्नेहभाव आहे व तो या निमित्ताने अधिकच दृढ झाला आहे.'' अशी भावना व्यक्त केली.

अध्यक्षीय भाषणानंतर मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली. या सर्व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन **श्री.भाऊसाहेब नरड सर** यांनी उत्तम प्रकारे केले. कार्यक्रमाचे आभार **श्री.मधुकर शिरोळे** यांनी मानले. कार्यक्रमानंतर सर्वांनी मंडळातर्फे ठेवलेल्या स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला.

शब्दांकन - भाऊसाहेब नरड सर





*कार्यक्रमास उपस्थित असलेला जनसमुदाय.*




# Parshwa
Collections

**Anuj Shingvi**
**(Kanhurkar)**





Dealers in :
• Mobiles • Computers
• Gift Articles • Repairs
Distributor of :
**IBall Computers, Laptops & Peripherals.**

1/1, Lalwani Estate, Opp. Lotus Court, Pune-Satara Road, Pune - 411 037.
Tel. 24274888, Centrax : 5055, Mobile : 9890431190

# मंडळाचे बोधचिन्ह

पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे या संस्थेची स्थापना दि.०३.१२.१९७९ रोजी झाली, तेव्हापासून ही संस्था अनेक सामाजिक, शैक्षणिक उपक्रम करीत आहे. विशेषतः विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करणे आणि विद्यार्थ्यांसाठी पुण्यामध्ये वसतिगृह बांधणे हे संस्थेचे मुख्य उद्दिष्ट सुद्धा पूर्ण झाले आहे.

संस्थेची स्थापना होऊन खूप वर्ष झाले तरी संस्थेने स्वतःचे बोधचिन्ह तयार केलेले नव्हते. संस्थेमध्ये नवीन तरुण सभासद आल्यानंतर त्यांनी ही कल्पना संस्थेचे अध्यक्ष श्री.हौसाराम घोडके यांचेकडे मांडली. साधारण तीन वर्षापूर्वी श्री. हौसाराम घोडके माझ्याकडे अ'नगर येथे आले व त्यांनी मला संस्थेसाठी बोधचिन्ह तयार करण्याची विनंती केली.

मी डॉक्टर असलो तरी कलात्मक गोष्टी करण्याचा माझा छंद आहे. नेमकी तीच माहिती त्यांनी माझे जोष्ठ बंधु इंजि. विजयकुमार ठुबे यांचेकडून मिळविली. तसे ते त्यांच्या सामाजिक व शैक्षणिक कामामुळे माझ्या परिचयाचे होतेच.

त्यांनी सांगितल्यानंतर मी विचार करू लागलो की मंडळाचे बोधचिन्ह (Logo) असे असावे की, ज्यामध्ये पारनेरकर मंडळींची अस्मिता दिसली पाहिजे.

पारनेर तालुक्यातील मंडळी संपूर्ण जगभर पसरली आहेत. विविध क्षेत्रात प्राविण्य मिळविलेली तसेच सामाजिक कार्यात हिरीरीने भाग घेणारी व आपल्या मातृभूमीचा सन्मान करणारी आहेत. मला असे कळले की, मंडळास मदत करणारे कितीतरी देणगीदार असे आहेत की, त्यांनी ३-४ पिढ्यांपूर्वी गाव व तालुका सोडलेले आहे. पण आपले पूर्वज जेथे होते व त्यामुळेच आपण प्रगतीपथावर आहोत याचे आत्मभान त्यांना आहे.

पारनेरकरांची पूर्वीची पिढी ही शिक्षण क्षेत्रात अग्रेसर होती व आजसुद्धा आहे. पण आता त्याबरोबरच त्यांनी अभियांत्रिकी, औद्योगिक, संगणक, मेडीकल अशा विविध क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे. या सर्वांचे प्रतिक बोधचिन्हात यावे अशी माझी इच्छा होती. त्या दृष्टीने संपूर्ण जगाचा नकाशा समोर ठेऊन मी डिझाईन करु लागलो.

पारनेर तालुका शिक्षणाच्या बाबतीत नुसताच अग्रेसर नाही तर गुणवत्ता जपणारा आहे. त्याचे प्रतिक म्हणून दोन्ही हातामध्ये ग्रंथराज विसावलेला आपल्याला दिसत असून त्यापैकी एक हात स्त्रीचा व एक हात पुरुषाचा आहे. आपल्या स्त्रीयासुद्धा पुरुषांच्या बरोबरीने अग्रेसर आहेत हेच अधोरेखीत करण्याचा माझा हेतू आहे. त्यावरच आधुनिक युगाचे अभियांत्रिकीचे चक्रसुद्धा दिसेल. पण सध्या ज्याची चलती आहे असे संगणक शिरोभागी असून त्यामध्ये ''पारनेर'' हा शब्द पारनेर तालुक्याची वेगळीच शान दर्शवितो.

मंडळाच्या सर्व कार्यकर्त्यांनी मनापासून अहोरात्र काम करून पारनेर भवन ही इमारत पुण्यामध्ये उभी केलीच, परंतु एवढे असुनसुद्धा ते थांबलेले नाहीत तर अजुनसुद्धा ते त्याच तडफेने काम करीत आहेत.

मंडळाच्या पुढील कार्यास माझ्या कोटी कोटी शुभेच्छा!

**डॉ. शरद गोविंदराव ठुबे**
रेवती आरोग्यधाम, सावेडी, अहमदनगर.
फोन - ०२४१-२४२४४९४

# ग्रामस्थ अभिनंदन



❋ **श्री.वसंत दत्तात्रय पंदरकर** रा. पिंपळगाव पिसा यांची इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियर्सच्या पुणे केंद्रावर मानद सचिव म्हणून निवड झाली. त्यानिमित्त त्यांनी मंडळास रु.२०००/- देणगी दिली.

❋ **श्री.महेश बबनराव आढाव** रा.सांगवी सूर्या यांची महाराष्ट्र राज्य महसुल विभागात नायब तहसिलदार म्हणून पदोन्नती झाली. त्यानिमित्त त्यांनी मंडळास रु.१०००/- देणगी दिली.

❋ **श्री.पांडुरंग दिनकर दिवटे** रा.रूई छत्रपती यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रामध्ये शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाकरीता व विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी निरलसपणे अविरत कार्य केल्याबद्दल त्यांना दि.५.९.२०१० च्या शिक्षक दिनानिमित्त 'गुणवंत शिक्षक' पुरस्कार महानगरपालिकेतर्फे प्रदान करण्यात आला.



❋ **श्री.संपतराव गोविंद पानसरे** रा.कळस यांची पिंपरी-चिंचवड महानगर पालिकेच्या शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी निवड झाली.



❋ **प्रा. सौ. शुभांगी सुनील औटी**, रा.पारनेर या अण्णासाहेब मगर महाविद्यालय हडपसर येथे वाणिज्य विभागात कार्यरत असून 'Socio-Economic Study of Women Entrepreneurship in the Development of Maharashtra with Special Reference to Pune District' या विषयावर त्यांना पुणे विद्यापीठाची पी.एच.डी. पदवी प्रदान करण्यात आली.





❋ **श्री.राहुल अमोलकचंद खिंवसरा** रा.कान्हूर पठार हे अत्यंत प्रतिकूल अशा शारीरिक व आर्थिक परिस्थितीमध्ये चार्टर्ड अकौंटंटची परिक्षा उत्तीर्ण झाले. विशेष म्हणजे त्यांना दृष्टीदोष असून फक्त ४० टक्केच दिसते.

❋ **डॉ. कु. प्रियंका विजय देशमुख** रा. पारनेर ही बी.ए.एम.एस. परीक्षा उत्तीर्ण झाली.





❋ **कु. शिल्पा बाजीराव जगदाळे** रा.बाभुळवाडे ही एम.फार्मसी परीक्षा उत्तीर्ण झाली. तिला ६९ टक्के गुण मिळाले आहेत.

❋ **श्री. विजय दिनकर काकडे** रा.कान्हूर पठार यांना दि.५ सप्टेंबर २०१० च्या शिक्षक दिनानिमित्त, अध्यापन क्षेत्रात लोकसेवेप्रित्यर्थ केलेल्या प्रशंसनीय कार्याबद्दल केंद्र सरकारतर्फे **'राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार'** प्रदान करण्यात आला.



*राष्ट्रपती सौ.प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते सत्कार स्विकारताना श्री.विजय दिनकर काकडे व डावीकडे नाम.कपील सिब्बल, शिक्षणमंत्री, केंद्र सरकार.*

**मळगंगा बिल्डिंग अँड प्लंबिंग कॉन्ट्रॅक्टर**

*पुणे महानगरपालिका व पिंपरी चिंचवड महानगरपालिका लायसेन्स कॉन्ट्रॅक्टर*

नगरपालिकेची ऑफिशीयल कामे व एन.ओ.सी.ची सर्व कामे केली जातील.
वॉटर प्रुफींग, लिकेजची सर्व कामे खात्रीशीर केली जातील.
तसेच आर.सी.सी. व बिल्डींग कन्स्ट्रक्शनची सर्व कामे केली जातील.

**श्री.सदाशिव गणपत थोरात (करंदी)**
श्री.दत्तकृपा निवास, सिंहगड कॉलनी, जवळकर नगर, पिंपळे गुरव, पुणे ४११०२७.
फोन :- ६५१०२५५६, ९८५०७४०१९९, ९२२५५१४२६९

## विद्यार्थी अभिनंदन - दहावी



कुमार अमेय पांडुरंग गायकवाड रा.जवळे
९३.४५%

कु.धनश्री भास्कर चेमटे रा.वासुंदे
९३.२७%

कु.ईशा संतोष कटारिया रा.पाडळी दर्या
९२%



कु.अंकिता संभाजी गोरडे रा.लोणी मावळा
९२%



कुमार पुष्कर सुदाम गायके रा.वासुंदे
८०%




कु.तेजल राजेंद्र लटांबळे रा.पिंपळनेर
७२%

कु.पल्लवी जालींदर शेलार रा.ढोकी
८४%



कु.प्राजक्ता मुरलीधर जवक रा.रांजणगाव मशिद
८६%

## इ.१२वी सायन्स



कुमार प्रसाद बाळकृष्ण लोंढे, रा.कान्हूर पठार
७२%



कु.हर्षदा तुकाराम घोलप रा.चोंभूत ७०%

### ऋणनिर्देश



मंडळाचे ज्येष्ठ सदस्य **सी.ए.शिवाजीराव झावरे** यांनी **'माझे ध्यासपर्व'** हे आत्मचरित्र सत्कारीत विद्यार्थ्यांना भेट म्हणून विनामूल्य दिले. मदतीबद्दल मंडळ ऋणी आहे.

## विद्यार्थी अभिनंदन



❋ **कुमार प्रणव अशोक गाडेकर** रा. वडझिरे यास महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिष्यवृत्ती तसेच नॅशनल टॅलेंट स्कॉलरशिप मिळाली. २००९ मध्ये तो महाराष्ट्र प्रज्ञाशोध परिक्षेमध्ये महाराष्ट्रात दुसरा आला.



❋ **कु.ज्ञानल सुरेश शेळके** रा.नारायण गव्हाण हीस महाराष्ट्र राज्य पूर्व प्राथमिक शिष्यवृत्ती मिळाली असून ती गुणवत्ता यादीत १२वी आली आहे.



❋ **कु.शुभांगी शिवाजी थिटे** रा.वाळवणे ही महाराष्ट्र राज्य पूर्व प्राथमिक शिष्यवृत्तीमध्ये गुणानुक्रमांकाने ४०वी आली.



❋ **कुमार योगीराज सुभाष चौधरी** रा.पाडळी आळे हा इयत्ता ९ वी मध्ये शिकत असून त्यास केंद्र सरकारची एन.एम. एम.एस. ची शिष्यवृत्ती मिळाली.

## नांदा सौख्य भरे

❋ श्री.दिनकर जनार्दन घोडके रा.कान्हुर पठार यांचे सुपुत्र **चि.योगेश** व कै.शरद विजय दीक्षीत रा.बार्शी यांची सुकन्या **सौ.स्नेहल** यांचा शुभविवाह दिनांक ०२.०६.२०१० रोजी संपन्न झाला.

❋ श्री.नेमीचंद धनराज कटारिया रा.कासारे यांचे सुपुत्र **चि.पंकज** व श्री.सुर्यकांतजी गांधी रा.नेवासा यांची सुकन्या **सौ.सविता (साक्षी)** यांचा शुभविवाह दिनांक ०९.०७.२०१० रोजी संपन्न झाला.

❋ श्री.शिवाजी नामदेव दिवटे रा.बाबुर्डी यांचे सुपुत्र **चि.राहुल** व श्री. शंकर गुलाबराव झांबरे रा. होळकरवाडी यांची सुकन्या **सौ.पुनम** यांचा शुभविवाह दिनांक २८.११.२०१० रोजी संपन्न झाला.

❋ श्री.उत्तमराव यशवंत भांड रा.धोत्रे यांची सुकन्या **सौ.प्रितम** उर्फ **तनिष्का** व श्री.गणेश रामभाऊ मंडलीक रा.वांबोरी, ता.राहुरी यांचे सुपुत्र **चि.चंदन** यांचा शुभविवाह दिनांक २८.११.२०१० रोजी संपन्न झाला.

❋ श्री. अशोक तबाजी थोरात रा. पिंपरी जलसेन यांचे सुपुत्र **चि. विनोद** व श्री. दादाभाऊ आयलू कोठावळे रा. सांगवी सुर्या यांची सुकन्या **सौ.शुभांगी** यांचा शुभविवाह दिनांक ०७.१२.२०१० रोजी संपन्न झाला. याप्रसंगी श्री.थोरात यांनी रु.१००१/- देणगी दिली.

# आपण असे केले तर



❊ **कै. गिरीधारीलाल बिरदीचंद कटारिया** रा.तिखोल यांच्या दि. ०८.०८.२०१० च्या स्मृतीदिनानिमित्त सुपुत्र श्री.नितीन यांनी **रु.१०००/-** देणगी दिली.



❊ **श्री. उत्तमचंद रामचंद कर्नावट** रा. खडकवाडी यांनी त्यांचे सुपुत्र **स्व.मनोज** यांच्या दिनांक १०.०८.२०१० च्या स्मृतीदिनाप्रित्यर्थ मंडळास **रु.११००/-** देणगी दिली.



❊ **श्री. भाऊसाहेब गंगाराम नरड,** रा.कासारे यांनी त्यांच्या दि.०६.०८.२०१० च्या वाढदिवसानिमित्त मंडळास रु.१०००/- देणगी दिली.

❊ **श्रीमती वासंतीबाई किसनराव क्षीरसागर** यांच्या दि. १६.८.२०१० रोजीच्या स्मृती दिनानिमित्त त्यांचे भाचे प्रा. जगदीश तुकाराम देंडगे, रा. गांजीभोयरे व श्री. नामदेव मारुती साबळे, रा. रुई छत्रपती यांनी मंडळास प्रत्येकी **रु. १०००/-** देणगी दिली.




❊ श्री.अशोक दिगंबर घोरपडे रा.चिंचोली यांनी त्यांचे सुपुत्र **चि.हर्षल** याच्या दि.१६.०८.२०१० रोजीच्या सहाव्या वाढदिवसानिमित्त मंडळास **रु.११०१/-** देणगी दिली.




❊ **कै.भगवान काशिनाथ काळे** सर रा. गोरेगाव यांच्या दिनांक १९.१०.२०१० च्या स्मृतीदिनानिमित्त सुपुत्र श्री.अनिकेत यांनी **रु.१०००/-** देणगी दिली.

❊ **श्रीमती भामाबाई दत्तात्रय खोसे** रा.पाडळी दर्या यांच्या दि. १९.०९.२०१० च्या प्रथम स्मृती दिनानिमित्त त्यांचे सुपुत्र चि.गणेश यांनी मंडळास रु.११२५/- देणगी दिली.



*मुळचंद शिंगवी*

❊ **स्व. सौ. वासंतीबाई मुळचंद शिंगवी,** रा.पारनेर यांचे स्मरणार्थ पती मुळचंद हंसराज शिंगवी यांनी **रु.१०००/-** देणगी दिली.



❊ **चि. सोहम** यांच्या दिनांक ४.९.२०१० च्या वाढदिवसानिमीत्त पिताश्री श्री. तुकाराम विठ्ठल नरसाळे, रा. गोरेगाव यांनी मंडळास **रु. १०००/-** देणगी दिली.



❊ **श्री.सुभाष नारायण कारखिले** रा. राळेगण थेरपाळ यांनी त्यांचे सुपुत्र **चि. मयुर** याचे दि.०६.०९.२०१० चे वाढदिवसानिमित्त मंडळास रु.१०००/- देणगी दिली.




❊ **श्रीमती विमलाबाई कृष्णराव काळे** रा.पिंपरी जलसेन यांनी त्यांचे पती **कै.कृष्णराव मनाजी काळे** यांचे स्मरणार्थ मंडळास रु.१०००/- देणगी दिली.



❊ **कै. सौ. सुशिला मारुती पोटघन** रा.जातेगाव यांच्या दिनांक १७.०८.२०१० च्या स्मृती दिनानिमित्त सुपुत्र श्री.अविनाश यांनी मंडळास **रु.१०००/-** देणगी दिली.

❊ **कै.दत्तात्रय रामभाऊ ढुबे** रा.बाबुर्डी यांचे दि.२९.०८.२०१० च्या स्मृती दिनानिमित्त त्यांचे सुपुत्र चि.प्रविण यांनी मंडळास रु.५००/- देणगी दिली.

❊ **कै.सदाशिव किसन शिंदे व कै.श्रीमती सिंधु सदाशिव शिंदे** रा. सारोळे अडवाई यांच्या स्मृतीप्रित्यर्थ त्यांचे सुपुत्र चि.विकास यांनी मंडळास **रु.१०००/-** देणगी दिली.








❊ **कै. श्रीमती लक्ष्मीबाई आश्रुजी आग्रे** रा.पारनेर यांचे स्मरणार्थ त्यांचे सुपुत्र श्री.अशोक यांनी मंडळास **रु.५००१/-** देणगी दिली.




❊ **कै. तुळशीराम नारायण कळमकर व त्यांच्या पत्नी कै.देऊबाई** रा.कळमकर वाडी यांच्या प्रथम स्मृती दिनानिमित्त त्यांचे सुपुत्र कर्नल विश्वनाथ यांनी मंडळास **रु.१०००/-** देणगी दिली.



❊ **कै.भिकाजी मारुती शेळके गुरूजी** रा.भोंद्रे यांचे स्मरणार्थ त्यांचे सुपुत्र श्री.भास्करराव यांनी मंडळास **रु.१००१/-** देणगी दिली.



❊ **कै.विष्णुपंत अनंतराव पोळ** रा.पारनेर यांचे स्मरणार्थ त्यांचे सुपुत्र श्री.मनोज यांनी मंडळास रु.२०००/- देणगी दिली.

# आपण असे केले तर



श्री.अर्जुन मारुती सुडके, रा.सुडकेमळा, अहमदनगर यांनी त्यांच्या पत्नी **कै.सौ. लिलावतीबाई** यांच्या दिनांक १४.०६.२०१० च्या स्मृती दिनाप्रित्यर्थ मंडळास रु.१०००/- देणगी दिली.



**कै.प्रभाकर अनंतराव पोळ** रा.पारनेर यांचे स्मरणार्थ त्यांचे सुपुत्र चि.मंगेश यांनी मंडळास रु.१०००/- देणगी दिली.

# 'पारनेर तालुका युवा मंडळ नवी मुंबई'ची ऐतिहासिक स्थापना!

मुंबईचे पारनेर जे काम हाती घेतात ते तडीस नेतात. आजपर्यंत ते अनेक उपक्रम तालुक्यात व मुंबईत यशस्वीपणे राबवित आहेत. **दि.२१.११.२०१० ला प्रथमच त्यांनी आमदार विजयराव औटी, सॉलिसीटर गुलाबराव शेळके, श्री.विश्वनाथ कोरडे, श्री.ज्ञानदेव वाफारे, श्री.संदिप घनदाट, श्री.काशिनाथ दाते सर, श्री.बाबाशेठ कवाद, ॲड.पांडुरंग गायकवाड व श्री.हौसाराम घोडके यांचे प्रमुख उपस्थितीत 'पारनेर तालुका युवा मंडळ नवी मुंबई'** या नावाने संस्था स्थापन केल्याचे जाहीर केले.

या मंडळाच्या स्थापनेसाठी **श्री.गणपत वाफारे, श्री.भाऊसाहेब आहेर, श्री.श्रीहरी पवळे सर** व त्यांच्या सर्व सहकारी मित्रांनी अथक परिश्रम केले. त्याबद्दल त्यांचे **त्रिवार अभिनंदन!**

उद्‌घाटन प्रसंगी नवी मुंबईचे विष्णुदास भावे नाट्यगृह गर्दीने ओसंडून वाहत होते. यावरूनच पारनेरकरांना हा उपक्रम किती आवडला हे दिसून आले. आलेल्या सर्व प्रमुख वक्त्यांनीच उपक्रमाचे कौतुक करतानाच इशारा दिला की, 'मंडळ स्थापन करणे सोपे आहे पण ते सातत्याने चालवीणे अतिशय चिकाटीचे काम आहे'. याकरिता सर्वांनी **'पारनेर तालुका मित्र मंडळ पुणे' चे उदाहरण देऊन सांगितले की, पुणेकर मंडळीप्रमाणे सातत्य, चिकाटी व पारदर्शकता ठेवल्यास या मंडळाचे भविष्य निश्चितच उज्वल आहे.**

या उद्‌घाटन प्रसंगी पारनेर तालुका मित्र मंडळाचे पदाधिकारी **श्री.हौसाराम घोडके, डॉ.बाळासाहेब बांडे, श्री.मधुकर शिरोळ, श्री.अशोक वाबळे, श्री.सुनील पोटे, प्रा.गोरक्ष जगताप व श्री.रामदास शिर्के** आवर्जून उपस्थित होते.

**पारनेर तालुका युवा मंडळ नवी मुंबई च्या भावी वाटचालीस आमच्या हार्दिक शुभेच्छा !**

वार्तांकन - सुनील पोटे

# निधन वार्ता



❋ **श्रीमती इचरतबाई तेजमलजी कोठारी** (वय ८२) रा. वडगाव दर्या यांचे निधन दि.**२८.०७.२०१०** रोजी झाले.

❋ **राधाकृष्ण विठ्ठल गरुड**, (वय ८४) रा.कान्हुर पठार यांचे निधन दि. **२८.०७.२०१०** रोजी झाले.



❋ **गुलाबराव सोपान इरोळे** (वय ५७) रा.सांगवी सुर्या यांचे निधन दि. **०९.०८.२०१०** रोजी झाले.



❋ **बन्सीलालजी रुपचंदजी गांधी** (वय ९०) रा.सुपे यांचे निधन दि. **२७.०८.२०१०** रोजी झाले.




❋ **गणपतराव विष्णु सुंबरे** (वय ६०) रा.पिंपळगाव रोठा यांचे निधन दि. **०३.०९.२०१०** रोजी झाले.



❋ **पिरताजी महिपती काळे** (वय ७२) रा.कर्जुले हरेश्वर यांचे निधन दिनांक **०३.१०.२०१०** रोजी झाले.



❋ **विक्रम विजयकुमार बोरा** (वय २८) रा.पारनेर यांचे निधन दिनांक **१०.१०.२०१०** रोजी झाले.



❋ **ॲड.नारायण सदाशिव भालेराव** (वय ७८) रा.पारनेर यांचे निधन दिनांक **२०.१०.२०१०** रोजी झाले.



❋ **प्रा.सी.ए. मुकुंद दत्तात्रय वाघमारे** (वय ५९) रा.पारनेर यांचे निधन दिनांक **२३.१०.२०१०** रोजी झाले.



❋ मंडळाचे देणगीदार श्री.दत्तात्रय मच्छिंद्र गव्हाणे रा.पाबळ ता.शिरुर जि.पुणे यांच्या मातोश्री **सौ.सोनाबाई** (वय ६५) यांचे निधन दिनांक **०७.११.२०१०** रोजी झाले.

❋ **अंजनाबाई सखाराम गवळी** (वय ६५) रा.बाबुर्डी यांचे निधन दिनांक **१०.११.२०१०** रोजी झाले.

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे
## कार्यकारिणी सदस्य (सन २०१०-२०१३) परिचय

### हौसाराम विठ्ठल घोडके
(अध्यक्ष)



**मूळ गाव** - पारनेर
टाटा मोटर्स मधून सेवा निवृत्त
सामाजिक कार्याची आवड.
**अध्यक्ष** या नात्याने पारनेर तालुका मित्र मंडळाची धुरा सन २००२ पासून यशस्वीरित्या सांभाळत आहेत.
**मो.**- ९४२०६९६७९०

### सखाराम कोंडिबा गागरे
(उपाध्यक्ष)



**मुळ गाव** - वनकुटे,
टाटा मोटर्स मधून सेवा निवृत्त
**संस्थापक अध्यक्ष** - श्री साईबाबा नागरी सह. पतसंस्था, सांगवी, पुणे - ४११ ०२७.
सामाजिक कार्याची आवड.
**मो.**- ९७३००७५०३३

### बाजीराव झुंजारराव जगदाळे
(सेक्रेटरी)



**मूळ गाव** - बाभुळवाडे
**नोकरी** - किर्लोस्कर ऑईल इंजिन लि. खडकी
**सचिव,** ज्ञानसागर नागरी सहकारी पतसंस्था, भोसरी. **संचालक,** भोजापूर सार्व. वाचनालय व ग्रंथालय, भोसरी. **संचालक,** श्री.साईबाबा नागरी सहकारी पतसंस्था, सांगवी. **मो.** ९०११०२१४३०

### सुनील कुंडलिक पोटे
(सहसेक्रेटरी) एम.ए.बी.एड.



**मूळ गाव** - बाभुळवाडे
पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत माध्यमिक शिक्षक.
**जिल्हा समन्वयक-** केंद्र शासन आयोजित राष्ट्रीय बाल विज्ञान परिषद, पुणे.
**सचिव** - अंजना मेडिकल फाऊंडेशन, भोसरी, पुणे - ४११०३९.
**मो.** ९२२६९२१०८८ E-mail : sunilkpote@gmail.com

### डॉ. बाळासाहेब दगडू बांडे
(कार्यवाहक)



**मूळ गाव** - टाकळी ढोकेश्वर
**शिक्षण** - एम.बी.बी.एस., एम.डी. (ॲनेस्थेशिया) एम.डी. (जन. मेडिसिन) डिप्लोमा इन इन्सेटीव्ह केअर (युरोप) सध्या के.ई.एम. हॉस्पिटलचे कन्सल्टंट फिजीशीयन, अनेस्थेशिस्ट ॲन्ड इन्टेन्सिव्ह केअर स्पेशालिस्ट, **उपाध्यक्ष** - इंडियन सोसा. ऑफ क्रिटीकल केअर मेडिसीन. **फोन** -२४२६२१४७ **मो.**- ९८२२०५१५९३
E-mail : drbandebd@hotmail.com

### इंजि. विजयकुमार गोविंदराव ठुबे (अध्यक्ष,बां.स.)



**मूळ गाव** - कान्हूर पठार
**शिक्षण** - बी.ई.सिव्हील, एम.एस्सी.,
उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बाधकाम विभाग, महाराष्ट्र शासन.
**संस्थापक अध्यक्ष** - अहमदनगर जिल्हा मराठा सेवा नागरी सह.पतसंस्था, अहमदनगर. **प्रदेश महासचिव,** मराठा सेवा संघ महाराष्ट्र, **अध्यक्ष** - कान्हूर परिसर अभियंता प्रतिष्ठान, कान्हूर पठार. महाराष्ट्र शासनाचा **'उत्कृष्ट अभियंता पुरस्कार'** प्राप्त. **फोन** - २४२६३३५८, **मो.**- ९४२२०२६२२५

### मधुकर हौशाभाऊ शिरोळे
(सहकार्यवाहक)



**मूळ गाव** - पाडळी दर्या,
**नोकरी** -
एस.के.एफ. इंडिया लि. चिंचवड.
**कार्याध्यक्ष** -
श्री शिवाजी उदय मंडळ, चिंचवड.
**कार्यकारिणी सदस्य** -
अहमदनगर जिल्हा मित्रमंडळ पुणे.
**मो.**- ९९२२१६६१२५.

### अशोक विश्वनाथ वाबळे
(सदस्य)



**मूळ गाव** - निघोज
**व्यवसाय** - बांधकाम
**अध्यक्ष** - वॉर्ड क्र. ८६, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, पिंपरी चिंचवड शहर.
**मो.**- ९८८१६०८३५७

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे
## कार्यकारिणी सदस्य (सन २०१०-२०१३) परिचय

### भाऊसाहेब गंगाराम नरड



(सदस्य)

**मूळ गाव** - कासारे
**शिक्षण** - बी.ए.बी.एड.
**पर्यवेक्षक** : एस.एस.जी.जी. विद्यालय, मळवली, ता.मावळ,
**खजिनदार** - संत शिरोमणी सावता महाराज प्रतिष्ठान, गणेशनगर, वडगाव शेरी. **उपाध्यक्ष** - समता परिषद, वडगाव शेरी.
**मो.**- ९७६७७२५८११

### मुरलीधर पंढरीनाथ चौधरी



(सदस्य)

**मूळ गाव** - हिवरे कोरडा
**संचालक** - साईबाबा नागरी सहकारी पतसंस्था, सांगवी.
अडवाणी ऑर्लिकॉन मधून सेवानिवृत्त. स्वतःचा व्यवसाय. सामाजिक व धार्मिक कार्याची आवड.
**मो.**- ९३२५६३५२४१

### तारकराम सिताराम झावरे



(सदस्य)

**मूळ गाव** - टाकळी ढोकेश्वर
**शिक्षण** - बी.एस्सी. (ॲग्री)
सामाजिक कार्याची आवड.
**नोकरी** - कृषी अधिकारी, महाराष्ट्र शासन.
**अध्यक्ष** - गिताई प्रतिष्ठान, अ'नगर.
**राज्यस्तरीय राजर्षि शाहू महाराज** पुरस्कार प्राप्त.
**मो.**- ९४२३७८८९१७

### रामदास सोनाजी शिर्के



(सदस्य)

**मूळ गाव** - कर्जुले हर्या
**शिक्षण** - बी.कॉम, जी.डी.सी.ॲण्ड ए.
सध्या - गव्हर्नमेंट सर्टिफाईड लेखा परिक्षक सह संस्था व सार्वजनिक न्यास.
**अध्यक्ष** - महाराष्ट्र राज्य सह. संस्था सर्टिफाईड ऑडीटर्स असो. (पुणे).
**अध्यक्ष** - पुणे जिल्हा अकौटंट व ऑडिट सेवा सोसा. पुणे.
**संस्थापक** - पारनेर तालुका औद्योगिक वसाहत कर्जुले हर्या.
**मो.**- ९४२२०१६७६४ E-mail : ramdasshirke1@gmail.com

### प्रा.गोरक्ष रामकृष्ण जगताप



(सदस्य)

**मूळ गाव** - बाबुर्डी
**शिक्षण** - एम.एस्सी. बी.एड्.
सामाजिक कार्याची आवड.
**नोकरी** - लेक्चरर, ज्युनियर कॉलेज, साधना विद्यालय, हडपसर.

**मो.**- ९८६०९०७६१८

### काशीनाथ बापूराव गायकवाड



(सदस्य)

**मूळ गाव** - घाणेगाव
शासकीय तंत्रनिकेतन मधून समोपदेशक म्हणून सेवानिवृत्त.
**उपाध्यक्ष** - समता बालक मंदिर शिक्षण संस्था येरवडा.
**उपाध्यक्ष** -त्रिरत्न संघ येरवडा व ज्येष्ठ नागरिक संघ येरवडा. समाजकारणात आवड.
**फोन** - २६६८४८४२ **मो.**- ९४२२०१७९४०

### सुनील सुर्यकांत कोल्हे



(सदस्य)


**मूळ गाव** - लोणी हवेली
हल्ली स्थायिक - वाडेगव्हाण
**नोकरी** - टाटा मोटर्स.
सामाजिक कार्याची आवड.
महाराष्ट्र शासनातर्फे **'गुणवंत कामगार'** पुरस्कार प्राप्त.
**मो.**- ९९२२४३४९८६

### बाळासाहेब हरिभाऊ येणारे



(सदस्य)

**मूळ गाव** - रायतळे
**नोकरी** - किर्लोस्कर ऑईल इंजिन्स लि., खडकी
सामाजिक कार्याची आवड.
**मो.**- ९९२२९६४८२५




## -: विशेष सूचना :-

☺ **मंडळाचे विद्यार्थी वसतिगृह सुरु झाले असून विद्यार्थ्यांनी वसतिगृहात प्रवेश देणे सुरु झाले आहे.**

☺ पुरस्कार, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, उद्योगधंदा, नोकरीतील बढती तसेच सेवानिवृत्तीची तारीख या संबंधात आपल्या किंवा आसपासच्या पारनेर तालुक्यातील व्यक्तींची फोटोसहीत माहिती कळवावी.

☺ आपल्या मुलामुलींच्या तसेच नातेवाईकांच्या शुभविवाहाची बातमी संवादमध्ये छापली जाते. त्याकरीता एक लग्नपत्रिका मंडळाच्या पत्त्यावर पाठवावी किंवा फोनने कळवावे.

☺ आपल्या नातेवाईकांचे दुःखद निधन झाल्यास मंडळास अवश्य कळवावे. जेणेकरून इतरसुद्धा आपल्या दुःखात सहभागी होतील.

☺ विद्यार्थ्यांच्या १०वी, १२वी, इंजिनियरींग, मेडीकल व इतर सर्व शाखांचे परीक्षांचे मार्क्स कळविल्यास व फोटो पाठविल्यास सदर विद्यार्थ्यांचे अभिनंदन 'संवाद' मधून करण्यात येईल.

☺ कृपया घरचा, नोकरीचा बदललेला पत्ता व फोन नंबर त्वरीत कळवावा.

संपादकीय पत्ता :
**इंजि. विजयकुमार ढुबे**
५, पिंकरोज अपार्टमेंट, विद्यासागर कॉलनी,
सॅलीसबरी पार्क, पुणे - ४११ ०३७.
फोन - २४२६३३५८, मो.- ९४२२०२६२२५

ही पत्रिका पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे साठी प्रकाशक श्री.बाजीराव झुंजारराव जगदाळे व मुद्रक श्री.सुनील तोटे यांनी मे.चैतन्य एंटरप्रायजेस, ३९५, नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून 'पारनेर भवन', मंगलनगर, वाकड रोड, डांगे चौक, थेरगाव, पुणे - ४११०३३ येथून फक्त सभासदांसाठी प्रसिद्ध केली.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखांशी अथवा मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

**बुक - पोस्ट**
(छापील मजकूर)

श्रीमान ______________

पत्रव्यवहाराचा पत्ता :
**श्री. हौसाराम घोडके**
अध्यक्ष, पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे
ए-१/१, यशोधन सोसा., चिंतामणी नगर भाग-२,
बिबवेवाडी, पुणे ४११ ०३७. मो.- ९४२०६९६७९०